|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१९ /आ.अ.व वि.वि./**प्रशिक्षण/३२**/२०२१ दि. १०/०७/२०२१

**प्रति,**
**पदवीधारक/सद्य स्थितीत पदवीचे शिक्षण घेत असलेले**
**विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थी यांना..**

**विषय:- " ज्येष्ठ नागरिक सहाय्यता दूत " प्रमाणपत्र प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करणेबाबत..**

विद्यापीठ हे समाजातील शिक्षण-प्रशिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. औपचारीक अशा पदवी/पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या माध्यमातुन विद्यार्थी वर्गाला शिक्षित व सक्षम बनवण्याचे कार्य विद्यापीठ करतच असते. शिक्षणाबरोबरीनेच इतर सामाजिकदृष्टया महत्वाचे पूरक कार्यक्रम करुन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीचे भान व जाणिव निर्माण करणे अत्यावश्यक असते. अशा पूरक कार्यक्रमांच्या आयोजनात सहभाग घेऊन, सामिल होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यास हातभार लागत असतो. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडे वेळोवेळी विद्यापीठ परीक्षेत्रातील विविध महाविद्यालय व मान्यता प्राप्त संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरीक, विद्यार्थी व समाजातील विविध घटकांसाठी ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने विविध विस्तारीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते.

लॉकडाऊनच्या काळात सर्वात जास्त समस्यांचा सामना हा ज्येष्ठ नागरीक व विद्यार्थी यांना करावा लागला. तरी या काळात या घटकांसाठी या विभागाने भरीव असे कार्य केले आहे. विद्यापीठ परिक्षेत्रात विभागामार्फत घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून असे लक्षात आले की, ज्येष्ठ नागरीकांच्या अनेक समस्या व गरजा असून त्या ते काही कारणास्तव पुर्ण करु शकत नाहीत. तसेच अनेक ज्येष्ठ नागरीक हे केवळ पती पत्नी दोघेच किंवा एकटेच घरात राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यात त्यांच्या मुलींचे विवाह होऊन त्या सासरी गेलेल्या असतात व मुले शिक्षण, नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने गाव व शहर सोडून दुसरीकडे किंवा विदेशात स्थाईक झालेले असतात. सर्व सुख सुविधा उपलब्ध असतांनाही ज्येष्ठ नागरीक असलेल्या आई वडिलांना पाल्यांकडे राहणे योग्य वाटत नाही, किंवा त्यांचे मन व चित्त आपले गाव व परिसर सोडून दुसरीकडे लागत नसल्याने अनेक जेष्ठ नागरीक आपापल्या घरीच एकाकीपणाचे जीवन जगत असल्याचे आढळून आले.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ परीक्षेत्रात सुमारे ३०० ज्येष्ठ नागरीक संघ असुन ज्येष्ठ नागरीक संघाचे पदाधिकारी असलेल्या अनेक जेष्ठ नागरीकांचे संपर्क क्रमांक या विभागाकडे आहेत. त्या माध्यमातुन ज्या ज्येष्ठ नागरीकांना खरोखरच काही अडचणी जसे, आरोग्य, किराणा, प्रवास, बँक व पोस्टाची कामे, घरगुती काम व मानसिक आधार हवा असतो. तसेच त्यांचे मानसिक समुपदेशन करणे, वेळोवेळी त्यांची काळजी घेणे अशी त्यांना हवी असलेली विविध कामे करणे यासाठी विद्यापीठामार्फत सुमारे १०० विद्यार्थी प्रशिक्षित करण्याचा मानस आहे. ज्या विद्यार्थ्यांना ज्येष्ठ नागरीकांच्या सोई व गरजेनुसार आपआपल्या परिसरात (जळगाव, धुळे व नंदुरबार) सशुल्क/निशुल्क पणे एका सामाजिक दृष्टीकानातुन कार्य करायचे असेल अशा विद्यार्थ्यांनी सोबत दिलेल्या गुगल फॉर्मवर विचारलेली माहिती भरुन **दि. १७ जुलै २०२१ रोजी पर्यंत नाव नोंदणी करायची आहे.** तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करुन काही मोजक्या विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत २० तासाचे प्रशिक्षण विद्यापीठ परीसरात देण्यात येईल. कोरोनाच्या परिस्थितीच्या अंदाज घेऊन जुलै महिन्याच्या तिसऱ्या किंवा शेवटच्या आठवडयात हे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले जाईल. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या प्रतिनिधींना प्रमाणपत्र देण्यात येईल, तरी लवकरात लवकर सोबत दिलेल्या गुगल फॉर्मवर नाव नोंदणी करावी. प्रशिक्षणासाठी निवडण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्क रु.१००/- संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कबचौउमवि, जळगाव याचे नावे असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कबचौउमवि जळगाव यांच्या **खाते क्रमांक :- 3229394958 ( IFSC Code- CBIN0284435 )** यावर ऑनलाईन पद्धतीने जमा करावी लागेल. प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थीसाठी निःशुल्क किट उपलब्ध करुन देण्यात येणार असुन चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था निःशुल्क करण्यात आली आहे. एका आगळया वेगळया व समाधान मिळवून देणाऱ्या प्रशिक्षणासाठी सर्वांनी त्वरित प्रतिसाद द्यावा. कळावे.!

**नाव नोदणीसाठी लिंक:- https://forms.gel/QyG7hJJsyzjTydDEA**

**आपला विश्वासू,**

**(प्रा.मनिष आर. जोशी)**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**Phone-0257-2257415/416**
**FAX-0257-2258403-406**
**वेबसाईट-nmu.ac.in**
**ई.मेल- directorllleb@nmu.ac.in**